# मराठी सिनेमाचा गौरव हरपला !

By Devendra Fadnavis on February 2nd, 2022




**ज्येष्ठ अभिनेते रमेश देव यांना देवेंद्र फडणवीस यांची श्रद्धांजली**

मुंबई, २ फेब्रुवारी ज्येष्ठ अभिनेते श्री रमेश देव यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दुःखद आहे. त्यांच्या निधनाने मराठी सिनेसृष्टीचा गौरव हरपला आहे. मराठी सिनेमासृष्टीची फार मोठी हानी त्यांच्या निधनाने झाली आहे, अशी शोकसंवेदना माजी मुख्यमंत्री आणि विधानसभेतील विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे. सुमारे तीन पिढ्यांनी रमेश देव यांच्या अभिनयाचा आस्वाद घेतला. मराठी आणि हिंदी मिळून 500 चित्रपट त्यांनी साकारले. टीव्ही मालिका, जाहिरात विश्व सुद्धा त्यांनी गाजवले. नाटकांमधून त्यांनी मराठी नाट्य विश्व समृद्ध केले, त्यासाठी अमूल्य योगदान दिले. रमेश देव यांची अनेकदा भेट होत असे. प्रत्येक वेळी त्यांच्यातील तरुण अभिनेता डोळ्यासमोर येई. जितके चांगले कलावंत, तितकेच चांगले व्यक्तिमत्त्व सुद्धा ते होते. त्यांच्या निधनाने मराठी सिनेसृष्टीने एक मोठा आधारस्तंभ गमावला आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांचे कुटुंबीय आणि चाहत्यांच्या दुःखात मी सहभागी आहे, असेही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.